**महाराष्ट्र शासन**

**कामगार आयुक्तालय**

कामगार आयुक्त यांचे कार्यालय, कामगार भवन, सी-२०, ई ब्लॉक, वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१

दूरध्वनी क्रमांक - ०२२-२६५७२९२२ ई-मेल : mahalabourcommr@gmail.com


क्र.काआ/वार्षिकविवरणपत्र/२०२० दिनांक : २०/०४/२०२०

प्रति,

सर्व कारखान्यांचे भोगवटादार / आस्थापनांचे व्यवस्थापक

**विषय:-** विविध कामगार अधिनियम आणि महाराष्ट्र दुकाने व आस्थापना (नोकरी व सेवाशर्तींचे विनियमन), अधिनियम, २०१७ या अधिनियमांतर्गत सन २०१९ या वर्षाकरिता सादर करण्यात येणारे एकत्रित वार्षिक विवरणपत्र दाखल करण्यास मुदतवाढ देण्यात आल्या बाबत.

**संदर्भ** :- महाराष्ट्र शासनाने पत्र क्र. संकीर्ण२०२०/प्र.क्र.१/काम-४अ, दिनांक २०/४/२०२०

उपरोक्त विषयास अनुसरून आपणास कळविण्यात येते की, विविध कामगार अधिनियम आणि महाराष्ट्र दुकाने व आस्थापना (नोकरी व सेवाशर्तींचे विनियमन), अधिनियम, २०१७ या अधिनियमांतर्गत एकत्रित वार्षिक विवरणपत्र ऑनलाईन संगणक प्रणालीद्वारे प्रत्येक वर्षी १ मार्चपूर्वी सादर केले जातात. तथापि, अनेक आस्थापनांना सन २०१९ चे वार्षिक विवरणपत्र कोविड-१९ च्या प्रादुर्भावामुळे जाहीर करण्यात आलेल्या लॉकडाऊनमुळे मुदतीत दाखल करता आले नसल्याने विविध उद्योजक व त्यांच्या संघटनांनी शासनाकडे विवरणपत्र दाखल करण्यात मुदतवाढ मिळावी म्हणून मागणी केली होती.

केंद्र व राज्य शासनाकडून कोविड-१९ चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी लॉकडाऊन जाहीर करण्यात आलेले आहे. त्यामुळे अत्यावश्यक कारखाने आस्थापना वगळून इतर कारखाने आस्थापना बंद करण्यात आलेल्या आहेत. सन २०१९ चे महाराष्ट्र दुकाने व आस्थापना (नोकरी व सेवाशर्तींचे विनियमन), अधिनियम, २०१७ आणि इतर विविध कामगार कायद्यांतर्गत एकत्रित वार्षिक विवरणपत्र हे १ मार्च, २०२० पूर्वी सादर करणे आवश्यक होते. परंतू मोठ्या संख्येने आस्थापना यांना विवरणपत्र सादर करता आले नाही ही वस्तुस्थिती व लॉकडाऊनच्या परिस्थितीत उद्भवलेल्या अभूतपूर्व आपत्तीचा फटका या कारखाने आस्थापनांना बसलेला आहे. ही बाब लक्षात घेऊन विवरणपत्र दाखल न करणाऱ्या उर्वरित सर्व आस्थापना यांना या आपत्कालीन परिस्थितीमध्ये विवरणपत्र दाखल करण्यास राज्य शासनाने ३१ जुलै, २०२० पर्यंत मुदतवाढ दिलेली आहे.

Scanned with CamScanner

करिता आपणास कळविण्यात येते की, शासनाने सन २०१९ या वर्षाकरिता सादर करण्यात येणाऱ्या एकत्रित वार्षिक विवरणपत्र दाखल करण्याची मुदत १ मार्च, २०२० ऐवजी ३१ जुलै, २०२० पर्यंत वाढविली आहे याची नोंद घ्यावी.

(डॉ. महेंद्र कल्याणकर, भा.प्र.से.)
कामगार आयुक्त,
महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रति,

१) सर्व आस्थापनांचे व्यवस्थापक,
२) महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स इंडस्ट्रिज आणि ॲग्रीकल्चर,
सेनापती बापट रोड, पुणे
३) एम्प्लॉयर्स फेडरेशन ऑफ इंडिया, मुंबई
४) बॉम्बे चेंबर ऑफ कॉमर्स, मुंबई
५) इंडियन मर्चंण्टस् चेंबर्स, मुंबई
६) मा. उपसचिव (कामगार-४)
७) सर्व अपर कामगार आयुक्त
८) सर्व कामगार उप आयुक्त
९) महाकामगार संकेतस्थळ

Scanned with CamScanner